तीळ गुळ घ्या, गोड गोड बोला

॥ वर्ष - 8 । अंक -185 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज™

संक्रांतीच्या शुभेच्छा!

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ मंगळवार, दिनांक 14 जानेवारी 2025 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

## राज्यात महापालिका निवडणुकांचे वेध

# एकनाथ शिंदे भाकरी फिरवणार!

### मुंबईत महापालिका निवडणुकीआधी मोठा ट्विस्ट

। मुंबई । महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्यात महापालिका निवडणुकांचे वेध लागले आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर राज्यात महापालिका निवडणुकांची कधीही घोषणा होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षाच्या गोटात स्थानिक पातळीवर संघटना मजबुत करण्यासाठी वेगवान घडामोडी सुरु झाल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून तर मोठा निर्णय घेण्यात आला. एकनाथ शिंदे मुंबईत भाकरी फिरवणार असल्याची माहिती मिळत आहे.**



एकनाथ शिंदे आता स्थानिक पातळीवरची पदाधिकाऱ्यांची फळीच बदलण्याच्या तयारीत आहेत. शिवसेना मुंबईत प्रत्येक शाखेतील पदाधिकाऱ्यांची नव्याने नियुक्ती करणार आहे. त्यामुळे पक्षाला मुंबईत नाविन्याने आणि उत्साहाने पालिका निवडणुकीला सामोरं जाता येणार असल्याची चर्चा आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. शिवसेनेच्या प्रमुख नेत्यांची आज मुंबईच्या रंगशारदा सभागृहात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत याबाबतचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती रामदास कदम यांनी बैठकीनंतर दिली.

"खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईतल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आज झाली. या बैठकीत संघटनात्मक चर्चा झाली. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीबाबत सुद्धा चर्चा झाली. येत्या 23 तारखेला मुंबईच्या बीकेसीमध्ये भव्य मेळावा पार पडेल. त्या मेळाव्यात शिवसेनेचे सर्व आमदार आणि खासदार यांचा भव्य सत्कार केला जाईल. मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार होईल. 23 तारखेला बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त हा मेळावा आयोजित केला आहे. मुंबईतील सर्व शाखाप्रमुख आणि सर्व पद रिक्त करून नवीन नियुक्ती केली जाईल", अशी महत्त्वाची माहिती रामदास कदम यांनी दिली.

### पदाधिकाऱ्यांची नव्याने नियुक्ती कशी होणार?

"मुलाखती घेऊन तशा प्रकारची नियुक्ती केली जाईल. कोणी कशाप्रकारे काम केलं याचा आढावा घेऊन समिती नियुक्ती करेल. गिरगाव, दादर अशाप्रकारे समित्या गठीत केल्या जातील. ज्या समितीला जे नाव योग्य वाटेल ते नाव ती समिती मुख्य नेते एकनाथ शिंदे यांना कळवेल आणि मग मुख्य नेते एकनाथ शिंदे त्याबाबत निर्णय घेऊन नियुक्ती करतील, असा निर्णय आजच्या बैठकीत झाला", असं रामदास कदम यांनी सांगितलं.

### उद्धव ठाकरे महायुतीत येतील?

यावेळी पत्रकारांनी रामदास आठवले यांना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे महायुतीत येतील का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली. "आगामी पालिकेबद्दल मुख्य नेते एकनाथ शिंदे निर्णय घेतील. शिवसेना-भाजप अशी आमची युती आहे. आमच्या युतीमध्ये अजिबात मतभेद नाहीत. कोणी आमच्या युतीमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला तरीही आमची युती राहील. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आता भीती वाटायला लागली. उद्धव ठाकरे आतापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल अत्यंत खालच्या भाषेत बोलले. निर्लज्ज सदासुखी अशा प्रकारे येथे आहेत. मला ते सांगायला सुद्धा लाज वाटते. इतका खालच्या पातळीत बोलले. त्यांचा पिल्लू तीन वेळा जाऊन फडणवीस यांना भेटलं. पंतप्रधानांना सुद्धा इतका वाईट बोलले. पंतप्रधान आणि अमित शाह यांच्यासोबत असं वाईट बोलल्यानंतर त्यांना फडणवीस एकत्र आणतील, असं मला वाटत नाही", अशी प्रतिक्रिया रामदास कदम यांनी दिली.

---

## वाहतूक कोंडीत पुण्याचे नाव पोहचले जगभरात

### महाराष्ट्रातून पुणे पहिल्या क्रमांकावर , मुंबईचा सहावा क्रमांक

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे शहरातील वाहतूक कोंडी पुणेकरांसाठी नवीन नाही. रस्त्यांचे नियोजन नसल्यामुळे पुणेकरांना रोजच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. काही किलोमीटर अंतर जाण्यासाठी तासन तास लागत असतो. माध्यमे आणि सामाजिक संस्थांकडून वारंवार हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. परंतु हा प्रश्न सोडवण्यात राज्यकर्ते अपयशी ठरले आहे. पुण्यातील वाहतूक कोंडी ही देशभर नाही तर जगभरातील विषय होऊ लागला आहे. भारतातील ३ शहरांमध्ये सर्वाधिक वाहतूक कोंडी होत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये पुणे चौथ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रातून पुणे पहिल्या क्रमांकावर आहे.**



### कोलकोता पहिल्या क्रमांकावर

टॉमटॉमच्या ट्रॅफिक इंडेक्स रिपोर्टनुसार, भारतातील ३ शहरांमध्ये सर्वाधिक वाहतूक कोंडी होते. 2024 च्या इंडेक्सनुसार कोलकोता भारतातील पहिल्या क्रमांकाचे वाहतूक कोंडी असणारे शहर आहे. कोलकोतामध्ये १० किलोमीटर अंतर कापण्यासाठी ३३ मिनिटे लागतात. जगाचा विचार केल्यावर कोलकता दुसऱ्या क्रमांकाचे वाहतूक कोंडी असणारे शहर आहे. पहिल्या क्रमांकावर कोलंबियामधील बॅरेंक्विला शहर आहे. भारतीय शहरांमध्ये हैदराबाद आणि चेन्नई देशात चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर आहेत. मुंबईकरांसाठी दिलासा म्हणजे देशातील टॉप पाच वाहतूक कोंडी असणाऱ्या शहरात मुंबई नाही. मुंबईचा क्रमांक सहावा आहे. अहमदाबाद सातव्या क्रमांकावर आहे.

### पुणे देशात तिसऱ्या क्रमांकावर

टॉमटॉम ट्रॅफिक इंडेक्सच्या रिपोर्टनुसार, भारतातील तीन शहरांमध्ये सर्वाधिक वाहतूक कोंडी होत असल्याची माहिती समोर आली आहे. ज्यात पुणे जागतिक पातळीवर चौथ्या क्रमांकावर तर भारतात तिसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. भारतची सिलिकॉन व्हॅली असलेले बंगळुरू देशातील दुसऱ्या क्रमांकाचे वाहतूक कोंडी असणारे शहर आहे. बंगळुरुमध्ये 10 किलोमीटर प्रवासासाठी सरासरी 33 मिनिटे लागतात. भारतातून तिसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्रातील पुणे शहर आहे. पुण्यातही

# खंडणीखोरांना चाप लावण्यासाठी निर्णय!

## खंडणीखोरांची संकेतस्थळावर तक्रार करण्याची सुविधा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बीड जिल्ह्यातील उद्योगांना खंडणी मागण्याच्या कहाण्या पुढे येत असताना असे प्रकार जिल्ह्यात होऊ नयेत आणि जिल्ह्याची ओळख उद्योगस्नेही व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने ठोस निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत 'एक खिडकी' योजना राबविण्यात येणार असून उद्योगांना विविध परवाने, परवानगी देण्यात येणार आहे. उद्योगांकडे खंडणी मागणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावरही तक्रार नोंदविता येणार आहे.**



बीड जिल्ह्यात कंपन्यांकडे खंडणी मागण्याच्या प्रकारातून हत्या प्रकरण पुढे आले आहे. त्यातून उद्योगांकडे मागण्यात येणाऱ्या खंडण्यांच्या अनेक कहाण्याही पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर असे प्रकार जिल्ह्यात होऊ नयेत, यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पुढाकार घेतला आहे. येत्या महिन्याभरात ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याबाबतची माहिती डुडी यांनी सोमवारी दिली.'उद्योग सुरू करण्यासाठी वेगवेगळ्या अकरा विभागांची परवानगी घ्यावी लागते. उद्योगांबरोबर स्टार्टअपसाठीही परवानगी आवश्यक असते. उद्योग आणि स्टार्टअपना दिल्या जाणाऱ्या परवानग्यांपैकी सात विभाग जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अंतर्गत येतात.

त्यामुळे या सात विभागातील परवाने 'एक खिडकी' योजनेच्या माध्यमातून देण्याचे नियोजित आहे.' जिल्ह्याची उद्योगक्षमता मोठी आहे. उद्योगांना, कंपन्यांना खंडणी मागण्याचे प्रकारही होत असल्याची शक्यता आहे. कायदा आणि सुव्यवस्था उत्तम असेल तर, उद्योजकांनाही विश्वास वाटतो. त्यामुळे उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याला प्राधान्य दिले जाईल. उद्योजकांना त्रास देणारे, खंडणीची मागणी करणारे, पैशांसाठी अडवणूक करणाऱ्यांवर यापुढे कारवाई केली जाईल. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर तक्रार नोंदविण्याची सुविधा दिली जाईल. खंडणी किंवा अन्य कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांना सूचना देऊन पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून खंडणीखोरांवर कारवाई केली जाईल, असेही डुडी यांनी सांगितले.दरम्यान, ग्रामीण भागातून जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक नागरिक येत असतात.त्यांना सोमवार ते शुक्रवार दुपारी तीन ते पाच या कालावधीत जिल्हाधिकारी भेटणार आहेत. तशी सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केली असून जिल्ह्यातील शाळा, आरोग्य केंद्र आणि अंगणवाड्यांची नियमित पाहणी करून योग्य त्या उपाययोजना कराव्यात. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याची सूचनाही डुडी यांनी अधिकाऱ्यांना केली आहे. जिल्हा उद्योगस्नेही करण्यासाठी 'एक खिडकी' योजना राबविण्याचे नियोजित आहे.बीड जिल्ह्यात कंपन्यांकडे खंडणी मागण्याच्या प्रकारातून हत्या प्रकरण पुढे आले आहे. त्यातून उद्योगांकडे मागण्यात येणाऱ्या खंडण्यांच्या अनेक कहाण्याही पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर असे प्रकार जिल्ह्यात होऊ नयेत, यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पुढाकार घेतला आहे. येत्या महिन्याभरात ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

### जिल्ह्याची उद्योगक्षमता मोठी

त्याबाबतची माहिती डुडी यांनी सोमवारी दिली.'उद्योग सुरू करण्यासाठी वेगवेगळ्या अकरा विभागांची परवानगी घ्यावी लागते. उद्योगांबरोबर स्टार्टअपसाठीही परवानगी आवश्यक असते. उद्योग आणि स्टार्टअपना दिल्या जाणाऱ्या परवानग्यांपैकी सात विभाग जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अंतर्गत येतात. त्यामुळे या सात विभागातील परवाने 'एक खिडकी' योजनेच्या माध्यमातून देण्याचे नियोजित आहे.' जिल्ह्याची उद्योगक्षमता मोठी आहे. उद्योगांना, कंपन्यांना खंडणी मागण्याचे प्रकारही होत असल्याची शक्यता आहे. कायदा आणि सुव्यवस्था उत्तम असेल तर, उद्योजकांनाही विश्वास वाटतो. त्यामुळे उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याला प्राधान्य दिले जाईल. उद्योजकांना त्रास देणारे, खंडणीची मागणी करणारे, पैशांसाठी अडवणूक करणाऱ्यांवर यापुढे कारवाई केली जाईल. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर तक्रार नोंदविण्याची सुविधा दिली जाईल.

# हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मार्ग बदलण्यास विरोध

## लढा उभारण्याचा खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा इशारा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'पुणे-नाशिक' सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मार्ग बदलण्यास शिरूरचे खासदार राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी विरोध दर्शविला आहे. हा प्रकल्पाअंतर्गत जुन्नर तालुक्यातील 'जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप-जीएमआरटी' येत असल्याने त्यांच्या शास्त्रज्ञांनी त्यावर तोडगा काढावा अन्यथा मार्ग बदलण्याच्या निर्णयाविरोधात लढा उभारावा लागेल, अशी भूमिका डॉ. कोल्हे यांनी घेतली आहे.**



त्यामुळे पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पावरून नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.'पुणे-नाशिक या 'सेमी हायस्पीड' रेल्वे प्रकल्पात जुन्नर तालुक्यातील 'जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप' (जीएमआरटी) प्रकल्प येत असल्याने हा मार्गच रद्द करण्यात आला आहे. त्याऐवजी पुणे, अहिल्यानगर, शिर्डीमार्गे नाशिक असा पर्यायी मार्ग निश्चित करून त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आला असून केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी जाहिर केले आहे. या पार्श्वभूमीवर नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळ आयोजित 'ग्लोबल कृषी महोत्सवा'च्या समारोपावेळी खासदार डॉ. कोल्हे यांनी मार्ग बदलण्यास विरोध दर्शविला. 'जीएमआरटी' प्रकल्पामुळे या भागात उद्योग व्यवसाय, कारखाने उभे राहू शकत नाहीत.जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांची अर्थव्यवस्था शेती व्यवसायाशी निगडीत आणि शेती व्यवसाय केंद्रीत झाली आहे. शेतमाल उत्तर आणि दक्षिण भागातील बाजारपेठेत पाठविण्यासाठी कमी खर्चिक रेल्वे प्रकल्पाची आवश्यकता आहे. गेल्या तीस वर्षात शेती क्षेत्रात अमूलाग्र बदल होत असताना जीएमआरटीमध्ये नवीन तंत्रज्ञान अद्याप का अवगत झाले नाही.

### शास्त्रज्ञांनी तोडगा काढला पाहिजे

जीएमआरटी प्रकल्प अभिमानास्पद असून हा प्रकल्प तालुक्यात कायम राहिला पाहिजे. मात्र त्यासाठी रेल्वे प्रकल्पही महत्त्वाचा असून त्यासंदर्भात 'जीएमआरटी'च्या शास्त्रज्ञांनी तोडगा काढला पाहिजे, असे डॉ.कोल्हे यांनी स्पष्ट केले. जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांची अर्थव्यवस्था शेती व्यवसायाशी निगडीत आणि शेती व्यवसाय केंद्रीत झाली आहे. पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाबाबत तोडगा न निघाल्यास आणि मार्ग बदलण्यात आल्यास त्याविरोधात लढा उभा केला जाईल, असा इशाराही डॉ. कोल्हे यांनी दिला.

## 10 हजाराहून अधिक सायकलस्वारांचे 'रजिस्ट्रेशन'

# "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन" च्या नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद!

**अविरत श्रमदान, सायकल मित्र पुणेसह विविध संघटनांचा सहभाग**

## अविरत श्रमदान, सायकल मित्र पुणेसह विविध संघटनांचा सहभाग

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंद्रायणी नदी स्वच्छता अन् संवर्धनाच्या जागृती करणे. पर्यावरण रक्षणाचा संदेश देणे आणि युवा पिढीमध्ये सायकलिंग व नियमित व्यायाम याबाबत जनजागृती करणे. या उद्देशाने आयोजित इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉनच्या नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पहिल्या चार दिवसांतच तब्बल १० हजार २८६ हून अधिक पर्यावरण प्रेमींनी सायकल रॅलीसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले आहे.**




### गिनिज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा मान...

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या पुढाकाराने आणि अविरत श्रमदान, सायकल मित्र-पुणे, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच यांच्यासह विविध पर्यावरण प्रेमी संस्था, संघटना आणि स्वयंसेवीवृत्तीने काम करणारे मान्यवर या 'रिव्हर सायक्लोथॉन'च्या आयोजनासाठी पुढाकार घेतात. पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील सुमारे 35 हजार सायकलपटू युवक-युवती आणि अबालवृद्ध सायकल रॅलीमध्ये सहभागी होतात. गतवर्षी रिव्हर सायक्लोथॉनची 2022 मध्ये 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये नोंद झाली आहे. 'सायकलची सर्वात मोठी रांग' ('Longest line of bicycles (static)') हे रेकॉर्ड, गिनीस वर्ल्ड रेकॉर्डस् मध्ये नोंदवण्यात आले होते.

श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू अशा तीर्थक्षेत्रांना जोडणारी इंद्रायणी नदीबाबत महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदयामध्ये विषेश महत्त्व आहे. इंद्रायणीचे पाणी तीर्थ म्हणून वारकरी प्राषण करतात. मात्र, नदी प्रदूषणामुळे इंद्रायणीचे अस्थित्व धोक्यात आले आहे. अशा पवित्र इंद्रायणीला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' ही मोहीम हाती घेण्यात आली. 2017 पासून प्रतिवर्षी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' आयोजित केली जाते. यंदा सायक्लोथॉचे 9 वे वर्ष आहे, अशी माहिती मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी दिली आहे.

येत्या रविवारी, दि. 19 जानेवारी 2025 रोजी भोसरी येथील गावजत्रा मैदानावर सकाळी 6 वाजता विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये ही सायक्लोथॉन होणार आहे.

'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन'मध्ये पर्यावरण प्रेमी, सायकलपटू आणि सर्वसामान्य नागरिकांना सहज सहभागी होता यावे. या करिता आयोजकांनी https://rivercyclothon.in/ हे संकेतस्थळ निर्माण केले आहे. याद्वारे ऑनलाईन पद्धतीने नागरिकांनी सायक्लोथॉनसाठी नोंदणी करता येते. विशेष म्हणजे, सायक्लोथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. संकेतस्थळ समाजमाध्यमांध्ये व्हायरल करण्यात आले. सोमवारी सायंकाळी 5 वाजेपर्यंत 10 हजार 286 नागरिकांनी यावर नोंदणी केली आहे. त्यामुळे सर्वस्तरातील नागरिकांचा या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

---

## महापालिका निवडणूकांचे बिगुल पुढील 3 महिन्यात वाजणार!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संकेत : पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा स्वबळावर लढणार!

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपच्या राज्यस्तरीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी काळातील महापालिका निवडणुकांबद्दल संकेत दिले आहे. पुढील तीन महिन्यात महापालिका निवडणुकांचे बिगूल वाजणार असे सांगत त्यांनी एकप्रकारे कामाला लागा असे सांगितले आहे. त्यामुळे गेल्या दोन वर्षापासून प्रशासकिय राजवटीत असलेल्या पिंपरी चिंचवड मधील इच्छुकांमध्ये उत्साह संचारला आहे. विशेष म्हणजे यावेळी स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांनी स्वबळावर लढण्याचे ठरवले आहे.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये गेल्या दोन वर्षाहून अधिक काळ प्रशासकीय राजवट आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये शहरांमधील भाजप महायुतीला घवघवीत यश मिळाले तिन्ही जागांवर महायुतीचे आमदार निवडून आले आहेत. भाजपकडे विधान परिषदेचे आमदार उमा खापरे आणि अमित गोरखे हे सुद्धा नियुक्त आहेत. भोसरी मधून आमदार महेश लांडगे तर चिंचवड मधून शंकर जगताप यांनी महापालिका निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. नुकतेच शंकर जगताप यांनी महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत. दुसरीकडे भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांची तिसरी टर्म असून 'मायक्रो प्लॅनिंग' त्यांची जमेची बाजू आहे. त्यामुळे या दोघांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील महापालिका निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकीमध्ये घवघवीत यश मिळवण्याची तयारी भाजपने केलेली आहे.

### विरोधकांमध्ये मरगळ; निवडणुकांना सामोरे जाण्याचे आव्हान

तर दुसरीकडे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना (ठाकरे गट) आणि काँग्रेस यांची ताकद नगण्य म्हणावी अशाच स्वरूपात आहे. विधानसभेत मिळालेल्या अपयशामुळे या तीनही पक्षांमध्ये प्रचंड मरगळ आलेली दिसून येत आहे. त्यामुळे आगामी काळात संघटनात्मक बदल करून महापालिका निवडणुकांना सामोरे जाण्याचे आव्हान या पक्षांसमोर असणार आहे.

### विधानसभेतील यश महापालिकेत कन्व्हर्ट होणार

विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळाल्यामुळे भाजपमधील इच्छुकांचे इनकमिंग प्रचंड आहे. तर दुसरीकडे विधानसभेत महायुतीला मिळालेले यश महापालिका निवडणुकीतही कन्व्हर्ट करून घेण्याचे स्थानिक पदाधिकाऱ्यांचे प्रयत्न असणार आहेत.



## भूमिका

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी छत्तीसगड येथे 'देशातील नक्षल समस्या २०२६ पर्यंत संपवू' असे विधान केले. त्याला छेद देणारा हल्ला नक्षलींनी घडवून आणला व तोही त्याच राज्यात. असे का व्हावे? मुळात नक्षलवादाची समस्या सोडवण्यासाठी अशी जाहीर विधाने करणे गरजेचे आहे की कृती?**

# नक्षलवाद संपवण्याचा अगम्य आशावाद...

दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेली एखादी समस्या सोडवण्याच्या बाबतीत राज्यकर्त्यांनी आशावादी असणे वा तशा आशयाची विधाने करणे यात काहीच गैर नाही. यामुळे त्या समस्येच्या सोडवणुकीची जबाबदारी असलेल्या यंत्रणातील विविध घटकांमध्ये आत्मविश्वास दुणावतो हे खरे. मात्र हा आशावाद अतिरंजित तसेच वास्तवाशी विसंगत नसावा. तसे झाले तर राज्यकर्त्यांचे हसे होते. ते कसे हे जाणून घ्यायचे असेल तर छत्तीसगडमध्ये नुकत्याच झालेल्या नक्षली हल्ल्याकडे बघायला हवे. अगदी काहीच दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रायपूर येथे २०२६ पर्यंत देशातील नक्षल समस्या संपवू असे जाहीर केले. नेमका त्याला छेद देणारा हा हल्ला नक्षलींनी घडवून आणला व तोही त्याच राज्यात. यात आठ जवान शहीद झाले. याच घोषणेचा आधार घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी गडचिरोलीत वर्षाच्या पहिल्याच दिवशी असेच विधान केले. सुदैवाने येथे तसे काही घडले नाही व घडूही नये ही अपेक्षा रास्त असली तरी गेल्या पाच दशकांपासून मूळ धरून असलेल्या या समस्येच्या बाबतीत इतका अगम्य आशावाद दर्शवणे योग्य कसे ठरू शकते असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. राज्यघटनेवर नाही तर हिंसेच्या मार्गाने राजकीय सत्ता यावर विश्वास असलेल्या माओच्या विचारांवर उभ्या झालेल्या या चळवळीला अनेक आयाम आहेत व त्याचे स्वरूप बहुपदरी आहे. देशाच्या मध्यभागी असलेल्या आदिवासीबहुल भागात निर्माण झालेला विकासाचा असमतोल, सरकारी पातळीवरून होणारा अन्याय, या भागातील नागरिकांचे सामाजिक व आर्थिक मागासलेपण यातून ही चळवळ उभी राहिली व स्थिरावली. सध्या तिला घरघर लागल्याचे जाणवत असले तरी ती विशिष्ट कालावधीत संपेल असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरू शकते. ताजा हल्ला हेच दाखवून देतो. या चळवळीला सध्या मनुष्यबळाची टंचाई जाणवते आहे, त्यातले एकजात सारे वरिष्ठ नक्षली वृद्धत्वाकडे झुकले आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या हिंसक कारवाया कमी होण्यात झाला हे खरे असले तरी यावरून ते संपले असे म्हणणे नक्कीच घाईचे ठरेल. ते कसे हे समजून घेण्याआधी नक्षली व त्यांची कार्यपद्धती यावर थोडा प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

कुठल्याही सशस्त्र चळवळीचा उद्देश हिंसेच्या माध्यमातून दहशत निर्माण करणे हा असतो. मात्र या चळवळीचा हा एकमेव उद्देश नाही. त्याशिवाय सरकारच्या धोरण विसंगतीवर बोट ठेवणे, जनतेत असंतोष निर्माण करणे, त्याला जनयुद्धाचे स्वरूप देणे, त्यासाठी समर्थक संघटनांच्या माध्यमातून सतत प्रयत्नरत राहणे अशी अनेक कामे या चळवळीकडून होत असतात. दहशतवादी व नक्षली यात फरक आहे असे म्हटले जाते ते या पार्श्वभूमीवर. त्यामुळे यांना संपवायचा निर्धार करायचा असेल तर हे युद्ध सर्वच पातळ्यांवर लढावे लागेल. म्हणजे शस्त्रासहित व शस्त्राविना. शस्त्राच्या लढाईत सध्या सरकारला यश मिळत असेल पण त्याशिवाय जी लढाई (म्हणजे विकासाची) लढायची आहे त्याचे काय? नक्षलग्रस्त भागातील विकासाचे सर्व प्रश्न सुटले असे राज्यकर्त्यांना म्हणायचे आहे काय? तसे असेल तर या भागात शिक्षण, पिण्याचे पाणी, आरोग्य या समस्या अजूनही कायम कशा? नुसते मोठे उद्योग (म्हणजे खाणी) उभारून या भागाचा विकास होईल असे राज्यकर्त्यांना म्हणायचे आहे काय? मुळात खाण म्हणजे विकास हा सरकारी तर्कच चुकीचा आहे. तसे असते तर गेल्या अनेक वर्षांपासून खाणींचे अस्तित्व असलेल्या दंतेवाडाजवळील बैलाडिला परिसरातून नक्षली विचार हद्दपार झाला असता. तसे झाले नाही. उलट या भागात याच खाणमालक वा कंत्राटदारांकडून नक्षली खंडणी उकळू लागले व स्वत:चा कार्यभाग साधत राहिले.

## प्रासंगिक »

### पालक नकोत!

***उद्देश भले जिल्ह्याच्या विकासाचा असेल! पण प्रत्यक्षात आपापल्या पित्त्यांना, कंत्राटदारांना कामे देणे आणि सर्व निधी वाटून खाणे हेच होते...***

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला झाली. मतमोजणी २३ नोव्हेंबरला झाल्यानंतर ५ डिसेंबरला भव्य सोहळ्यात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची तर एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मंत्रिमंडळ विस्तारात आणखी पंधरवडा गेला आणि त्यानंतर आठवडाभराने २१ डिसेंबरास शपथ घेतलेल्या मंत्र्यांस आपण कोणत्या खात्याची जबाबदारी हाताळणार ते कळले. या खातेवाटपासही आता दोन आठवडे उलटून गेले. तरीही फडणवीस, शिंदे वगळता सरकार कामाला लागले आहे असे चित्र अजूनही दुरापास्तच. तीन-तीन पक्षांची सत्ताधारी आघाडी, इतके दणकट बहुमत आणि तरीही सरकार बाळसे धरताना दिसत नाही, असे का?याचे कारण या मंत्रिमंडळातील अनेकांचा डोळा पालकमंत्रीपदावर असणे.

सरकारी कार्यालयांमध्ये आपली कामे वेळेत व्हावीत ही सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे. ती पूर्ण करण्यात मुख्यमंत्री फडणवीस व त्यांचे सरकार यशस्वी झाल्यास महायुती सरकारवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. शासकीय कामकाजात गतिमानता येण्यासाठी कठोर पावले मुख्यमंत्री फडणवीस यांना उचलावी लागतील.

# आघाड्यांची सरकारे सत्तेत राज्याची पीछेहाट झाली

तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनात अधिक सुसूत्रता आणण्याकरिता शासकीय कार्यनियमावलीत (रुल्स ऑफ बिझनेस) सुधारणा करण्याबरोबरच सामान्य नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी सात कलमी कृती कार्यक्रम जाहीर केला. देशात महाराष्ट्राच्या प्रशासनाचा आदर्श मानला जातो. प्रशासनानेही सरकारच्या कारभारात एक वेगळा ठसा उमटविला होता. एखादी गोष्ट चुकीची असल्यास ती करू नये, असे सांगण्याचे धाडस तेव्हा सनदी अधिकाऱ्यांमध्ये होते. विशेष म्हणजे तेव्हा अधिकाऱ्यांचा सल्ला गांभीर्याने घेतला जात होता. १९९५ नंतर एकापेक्षा अधिक पक्षांच्या आघाड्यांची सरकारे सत्तेत आली व तेव्हापासून राज्याची पीछेहाट सुरू झाली. त्याला प्रशासनही अपवाद ठरले नाही.राज्यकर्त्यांचा वचक असल्यास नोकरशाही किंवा अगदी तळागाळातील कर्मचारी वेडेवाकडे वागण्याचे धाडस करीत नाहीत. त्याच वेळी राज्यकर्त्यांचे



हात दगडाखाली असल्यास नोकरशाही डोईजड होते. पोलीस वा सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये अर्थकारण होते असे म्हटले जाते. तसे असल्यास हे अधिकारी पुढे मंत्र्यांनाही जुमानत नाहीत. राज्यकर्त्यांनी आमिषाला बळी पडू नये, असे संकेत असतात. या संदर्भात पुलोद सरकारमधील गृह राज्यमंत्री भाई वैद्य यांचे उदाहरण नेहमी दिले जाते. वैद्य यांच्या पुण्यातील निवासस्थानी एक फौजदार बदलीच्या कामासाठी आला व त्याने चांगल्या ठिकाणी बदलीसाठी पैसे देण्याची तयारी दर्शविली. भाई वैद्य यांनी तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पाचारण करून त्या फौजदाराला अटक करण्यास भाग पाडले होते. अशी काही उदाहरणे असतील पण ती विरळाच. सामान्य नागरिकांसाठी सात कलमी कार्यक्रम राबविण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उपक्रम स्तुत्यच आहे. यात शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, नागरिकांच्या तक्रारी वा प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, नागरिकांचे जीवन सुकर व्हावे (ईझ ऑफ लिव्हिंग) या संकल्पनेवर काम करावे, शासकीय प्रकल्पांना भेटी द्याव्यात याचा या सात कलमी कार्यक्रमांमध्ये समावेश करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आदेशाची पूर्तता करण्याची जबाबदारी वरिष्ठांपासून ते स्थानिक अधिकाऱ्यांची. या कृती कार्यक्रमाची तंतोतंत अंमलबजावणी झाल्यास शासकीय कारभारात नक्कीच सुधारणा होईल.फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी २०१५ मध्ये नागरिकांना शासकीय सेवा पारदर्शकपणे, गतिमान वा कालबद्ध मुदतीत मिळाव्यात म्हणून 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम' केला होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तपास यंत्रणांचे हात बांधले आहेत का?

## देशमुख कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे-मनोज जरांगे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांनी ९ डिसेंबरला हत्या करण्यात आली. या घटनेनंतर महाराष्ट्रातलं राजकीय आणि सामाजिक वातावरण पूर्णपणे ढवळून निघालं आहे. दरम्यान न्याय मिळावा म्हणून मस्साजोगचे गावकरी आणि संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हे आंदोलन करण्यासाठी बसले आहेत. यावेळी मनोज जरांगेंनी त्यांच्या आंदोलनाला भेट दिली.**



“संतोष देशमुख यांची हत्या झाली. त्यानंतर आता देशमुख कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे यासाठी आम्ही धनंजय देशमुख आणि संपूर्ण देशमुख कुटुंबाच्या बरोबर आहोत. धनंजय देशमुख यांनी आत्महत्या करु नये ही विनंती करायला मी त्यांना इथे आलो आहे. सरपंचाची हत्या होते, त्यानंतर न्याय मिळावा म्हणून जर सरपंचाच्या भावाला आत्महत्या करतो हे म्हणायची वेळ येत असेल तर ही बाब दुर्दैवी आहे.” असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.एखाद्या आंदोलनात आत्महत्या हा विषय आला की पायाखालची जमीन सरकते. आपल्याला संतोष देशमुख यांना न्याय मिळवून द्यायचा आहे. माझं देवेंद्र फडणवीस यांना सांगणं आहे की या कुटुंबाच्या मागण्या पूर्ण करा. संतोष देशमुख हत्या प्रकरणातले आरोपी आहेत त्यांना सांभाळू नका, देशमुख कुटुंबाला सांभाळा. कुणालाही सोडणार नाही हा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. माझं म्हणणं आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जबाबदारी घ्यावी आणि कुणालाही सोडू नये. तपास यंत्रणांचे हात बांधले गेले आहेत का? अशी शंका येण्यास जागा आहे. आज देशमुख कुटुंबाला संपूर्ण माहिती काय काय झालं ते सांगितलं पाहिजे.खंडणीतले जे आरोपी आहेत त्याबाबत एकच सांगणं आहे की खंडणीमुळेच हत्या झाली आहे. सामान्य शेतकऱ्यांनाही हा विषय कळतो तर तुम्ही तर अनुभवी मुख्यमंत्री आहात. खंडणीमुळेच हत्या झाली आहे. खंडणीतल्या आरोपीला मोकळं सोडणार असाल तर कुटुंब धीर सोडणार नाहीतर काय करणार? खंडणीमुळे खून झाला आहे, त्या आरोपीला ३०२ मध्ये घ्या अशीही मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं या प्रकरणात चुकीचं पाऊल पडलं आहे त्यामुळे आम्हाला आता यात उतरावं लागतं आहे. अजून पोलिसांना फेकलेला मोबाइल कसा सापडत नाही? त्या मोबाइलमध्ये बरेच पुरावे आहेत असंही कळलं आहे. अनेक लोक त्यात गुंतणार आहेत असं दिसतंय. खंडणीतला जो आरोपी वाचवू पाहात आहात, खंडणीतला आरोपी तुमचं सरकार चालवतो आहे का? असा प्रश्न मनोज जरांगेंनी विचारला. खंडणीतला आरोपी मोदींपेक्षा मोठा आहे का? कुठलं राजकारण, कुठलं सरकार तुम्ही चालवत आहात? असेही प्रश्न मनोज जरांगेंनी उपस्थित केले आहेत.आमचा संयम सुटत चालला आहे कारण धनंजय देशमुख आत्महत्या करायची असं म्हणत आहेत. त्यामुळे आमचे शब्दही त्याच पद्धतीने बाहेर पडणार. देशमुख कुटुंबाला जर धक्का लागला नाही, तर आम्हालाही मराठे म्हणतात हे ध्यानात ठेवा. चुकीच्या दिशेने तपास केला आणि देशमुख कुटुंबातल्या एकालाही काही झालं आणि जर तो आरोपी सुटला तर धनंजय मुंडेच्या टोळीचं जगणं मुश्किल करेन. असा इशारा मनोज जरांगेंनी दिला आहे.“संतोष देशमुख यांची हत्या झाली. त्यानंतर आता देशमुख कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे यासाठी आम्ही धनंजय देशमुख आणि संपूर्ण देशमुख कुटुंबाच्या बरोबर आहोत. धनंजय देशमुख यांनी आत्महत्या करु नये ही विनंती करायला मी त्यांना इथे आलो आहे. सरपंचाची हत्या होते, त्यानंतर न्याय मिळावा म्हणून जर सरपंचाच्या भावाला आत्महत्या करतो हे म्हणायची वेळ येत असेल तर ही बाब दुर्दैवी आहे.” असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. एखाद्या आंदोलनात आत्महत्या हा विषय आला की पायाखालची जमीन सरकते. आपल्याला संतोष देशमुख यांना न्याय मिळवून द्यायचा आहे.-

### आमचा संयम सुटत चालला

माझं देवेंद्र फडणवीस यांना सांगणं आहे की या कुटुंबाच्या मागण्या पूर्ण करा. संतोष देशमुख हत्या प्रकरणातले आरोपी आहेत त्यांना सांभाळू नका, देशमुख कुटुंबाला सांभाळा. कुणालाही सोडणार नाही हा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. माझं म्हणणं आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जबाबदारी घ्यावी आणि कुणालाही सोडू नये. तपास यंत्रणांचे हात बांधले गेले आहेत का? अशी शंका येण्यास जागा आहे. आज देशमुख कुटुंबाला संपूर्ण माहिती काय काय झालं ते सांगितलं पाहिजे.खंडणीतले जे आरोपी आहेत त्याबाबत एकच सांगणं आहे की खंडणीमुळेच हत्या झाली आहे. सामान्य शेतकऱ्यांनाही हा विषय कळतो तर तुम्ही तर अनुभवी मुख्यमंत्री आहात. खंडणीमुळेच हत्या झाली आहे. खंडणीतल्या आरोपीला मोकळं सोडणार असाल तर कुटुंब धीर सोडणार नाहीतर काय करणार? खंडणीमुळे खून झाला आहे, त्या आरोपीला ३०२ मध्ये घ्या अशीही मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं या प्रकरणात चुकीचं पाऊल पडलं आहे त्यामुळे आम्हाला आता यात उतरावं लागतं

# रोहित पवारांचा पोलीस प्रशासनावर संताप

## 35 दिवस उलटूनही हत्याकांड प्रकरणातील आरोपी फरार

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीडमधील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला ३५ दिवस उलटूनही अद्याप या हत्याकांड प्रकरणातील एक आरोपी फरार आहे. तर, वाल्मिक कराडविरोधात कठोर कारवाई झालेली नाही. अद्याप या प्रकरणात कोणालाही शिक्षा झालेली नाही.**



वाल्मिक कराड वगळता इतर आरोपींवर मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, विरोधी व सत्ताधारी पक्षांमधील नेते, आमदार वाल्मिक कराडवर कारवाई व्हावी यासाठी आंदोलन करत आहेत. दुसऱ्या बाजूला संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांना धमक्या दिल्या जात आहेत. भावाच्या मारेकऱ्यांना शिक्षा व्हावी यासाठी धनंजय देशमुख कायदेशीर लढाई लढत आहेत. मात्र, त्यांना ही लढाई लढण्यापासून रोखण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे संतापलेल्या धनंजय देशमुख यांनी आज (१३ जानेवारी) आंदोलन केलं. धनंजय देशमुखांनी पोलीस तपासावर नाराजी व्यक्त केली. तसेच, मोबाइल टॉवरवर चढून जीव देणार असल्याचा इशारा त्यांनी दिला होता. त्यानुसार आज ते टॉवरवर चढले. तर, मस्साजोगच्या ग्रामस्थांनी देखील गावात तीव्र आंदोलन केलं. धनंजय देशमुखांनी आत्महत्या करू नये यासाठी प्रशासन व अनेक नेत्यांनी त्यांची विनंती केली. मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांनी देखील धनंजय देशमुखांना विनवण्या केल्या. त्यानंतर तब्बल दोन तासांनी त्यांनी आपलं आंदोलन थांबवलं व ते टॉवरवरून खाली उतरले. मात्र, ३५ दिवसांनंतरही कोणत्याही आरोपीला कठोर शासन झालेलं नसल्यामुळे राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी देखील प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे.

### आरोपीला वाचवण्याची भूमिका

रोहित पवार यांनी एक्स या समाजमाध्यमावर याबाबत नाराजी व्यक्त करणारी पोस्ट केली आहे. पवार यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की “मस्साजोगचे मयत सरपंच संतोष देशमुख कुटुंबावर आंदोलन करण्याची वेळ येणे हे खूप दुर्दैवी आहे, परभणीच्या सूर्यवंशी कुटुंबाच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. न्याय देणारी व्यवस्थाच आरोपीला वाचवण्याची भूमिका घेत असेल तर देशमुख कुटुंबाकडे आंदोलनाशिवाय दुसरा पर्याय काय आहे? हे सरकारनेच सांगावं”.“राज्यभरातील नागरिकांच्या भावना तीव्र असताना, आरोपी कोण, सूत्रधार कोण, तपास कसा होतोय हे सर्वांना माहित असतानाही सरकार केवळ राजकीय तडजोडीसाठी भूमिका घेत नसेल तर याहून मोठं दुर्दैव काय असू शकतं?

# महाकुंभ 2025 चा शुभारंभ!

## साधू-संत आणि भाविक पहिल्या शाही स्नानासाठी दाखल

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगातील सर्वात मोठा धार्मिक महोत्सव अशी ओळख असणाऱ्या कुंभमेळ्याची आज सोमवार (१३ जानेवारी) पासून सुरुवात होणार आहे. उत्तरप्रदेशातील प्रयागराज या ठिकाणी असलेल्या गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांच्या संगमावर आज पौष पौर्णिमेनिमित्त पहिले शाही स्नान संपन्न होणार आहे . सोमवारी १३ जानेवारी ते बुधवार २६ फेब्रुवारी असे तब्बल ४५ दिवस महाकुंभ मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महाकुंभ मेळाव्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. प्रयागराजमध्ये आजपासून महाकुंभचा दिमाखदार शुभारंभ करण्यात आला आहे. या महाकुंभसाठी आधीपासूनच साधू-संत आणि भाविक प्रयागराजमध्ये दाखल झाले आहेत.**



या महाकुंभ मेळाव्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या अधिकृत ट्विटरद्वारे ट्वीट करत शुभेच्छा दिल्या आहेत. “भारतीय मूल्ये आणि संस्कृती जपणाऱ्या कोट्यवधी लोकांसाठी हा एक अतिशय खास दिवस आहे. प्रयागराजमध्ये महाकुंभ सुरू होत आहे. हा महाकुंभ असंख्य लोकांना श्रद्धा, भक्ती आणि संस्कृतीच्या पवित्र संगमात एकत्र आणतो. हा महाकुंभ भारताच्या आध्यात्मिक वारशाचं प्रतीक आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. उत्तरप्रदेशातील प्रयागराजमध्ये होणाऱ्या या महाकुंभ मेळाव्यासाठी 45 हजार पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या मेळाव्यासाठी साधू-संत, भाविक तसेच परदेशातील व्यक्ती सहभागी होणार असल्याने यंदा सुरक्षेसाठी 55 हून अधिक फोर्स असणार आहेत. तसेच तब्बल 45,000 पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. महाकुंभच्या संपूर्ण व्यवस्थापनासाठी २,७५० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने ४० कोटी भाविकांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सक्षम केले आहे. त्यासोबतच AI-आधारित तब्बल २६८ व्हिडीओ कॅमेरे गर्दीच्या हालचालींच्या निरीक्षणासाठी तैनात करण्यात आले आहेत. वाहतूक व्यवस्थापनासाठी आणि पार्किंगची सोय करण्यासाठी २४० AI-आधारित प्रणाली तैनात करण्यात आली आहे. प्रयागराज महाकुंभ मेळाव्यादरम्यान एकूण सहा शाही स्नान होणार आहेत. या कुंभमेळाव्यातील पहिला शाही स्नान 13 जानेवारी म्हणजे आज पार पडणार आहे. तर दुसरं शाही स्नान 14 जानेवारी 2025 रोजी मकरसंक्रातीच्या दिवशी असेल. यानंतर तिसरं स्नान 29 जानेवारी 2025 रोजी मौनी अमावस्येदिवशी होईल. तर चौथं स्नान 2 फेब्रुवारी 2025 रोजी वसंत पंचमी दिवशी होईल. यानंतरचे पाचवे शाही स्नान 12 फेब्रुवारी 2025 रोजी माघ पौर्णिमा दिवशी आणि शेवटचं शाही स्नान 26 फेब्रुवारी 2025 रोजी महाशिवरात्री दिवशी असेल.या महाकुंभ मेळाव्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या अधिकृत ट्विटरद्वारे ट्वीट करत शुभेच्छा दिल्या आहेत. “भारतीय मूल्ये आणि संस्कृती जपणाऱ्या कोट्यवधी लोकांसाठी हा एक अतिशय खास दिवस आहे. प्रयागराजमध्ये महाकुंभ सुरू होत आहे.

### तगडी सुरक्षा व्यवस्था

हा महाकुंभ असंख्य लोकांना श्रद्धा, भक्ती आणि संस्कृतीच्या पवित्र संगमात एकत्र आणतो. हा महाकुंभ भारताच्या आध्यात्मिक वारशाचं प्रतीक आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. उत्तरप्रदेशातील प्रयागराजमध्ये होणाऱ्या या महाकुंभ मेळाव्यासाठी 45 हजार पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या मेळाव्यासाठी साधू-संत, भाविक तसेच परदेशातील व्यक्ती सहभागी होणार असल्याने यंदा सुरक्षेसाठी 55 हून अधिक फोर्स असणार आहेत. तसेच तब्बल 45,000 पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. महाकुंभच्या संपूर्ण व्यवस्थापनासाठी २,७५० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने ४० कोटी भाविकांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सक्षम केले आहे. त्यासोबतच AI-आधारित तब्बल २६८ व्हिडीओ कॅमेरे गर्दीच्या हालचालींच्या निरीक्षणासाठी तैनात करण्यात आले आहेत. वाहतूक व्यवस्थापनासाठी आणि पार्किंगची सोय करण्यासाठी २४० AI-आधारित प्रणाली तैनात करण्यात आली आहे.

---

# ‘चार मुलांना जन्म द्या, एक लाख रुपये मिळवा’

## ब्राह्मण जोडप्यांसाठी परशुराम मंडळाच्या अध्यक्षांची ऑफर

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशच्या परशुराम कल्याण बोर्डाचे अध्यक्ष (कॅबिनेट दर्जा) पंडित विष्णू राजोरिया यांनी ब्राह्मण जोडप्यांना एक अजब आवाहन केलं आहे. चार मुलांना जन्म देणाऱ्या जोडप्यांना ते एक लाख रुपये रोख देणार आहेत. रविवारी इंदूरमधील एका कार्यक्रमात बोलत असताना राजोरिया यांनी ही घोषणा केली.**



‘सध्या जोडप्यांचा कल एकच मुल जन्माला घालण्याकडे असतो, पण सनातन धर्माच्या रक्षणासाठी चार मुलांना जन्म घालावा’, अशी अपेक्षा राजोरिया यांनी यावेळी व्यक्त केली.कॅबिनेट दर्जा प्राप्त असणारे राजोरिया म्हणाले की, परशुराम कल्याण मंडळाचा अध्यक्ष असलो तरी एक लाख रुपये रोख देण्याचा निर्णय मी माझ्या वैयक्तिक पातळीवर जाहीर करत आहे. या कार्यक्रमानंतर इंडिया टुडेशी बोलताना राजोरिया म्हणाले की, ब्राह्मण जोडप्यांनी चार मुलांना जन्म देणे आता काळाची गरज आहे. सनातन धर्माच्या रक्षणासाठी हे करावेच लागेल.विष्णू राजोरिया पुढे म्हणाले, “युवक तक्रार करतात की, शिक्षण महाग झाले आहे. त्यामुळे युवा जोडपे एकाच मुलाला जन्म देऊन थांबतात. पण यामुळे अनेक अडचणी उत्पन्न होत आहेत. मी तरुण जोडप्यांना आवाहन करू इच्छितो की, त्यांनी कसेतरी दिवस काढावेत. पण मुलं जन्माला घालण्यात मागे राहू नये. ज्येष्ठांकडून तर काही अपेक्षा ठेवू शकत नाही. म्हणून मी तरुण जोडप्यांना आवाहन करत आहे. तरुणच आपल्या पुढच्या पिढ्यांचे संरक्षण करू शकतात, त्यामुळं त्यांनी चार मुलांना जन्म घालावा.”या विधानाबाबत माध्यमांनी त्यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, मी केलेले आवाहन व्यक्तिगत पातळीवर आहे. त्याचा परशुराम कल्याण मंडळाशी काही संबंध नाही. मी एका सामाजिक कार्यक्रमात हे बोललो आहे. माझे विधान सामाजिक आहे. ब्राह्मण समाजातील मुलांना शिक्षण, प्रशिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, हा विश्वास दिला गेला पाहीजे.दरम्यान काँग्रेसचे नेते मुकेश नायक यांनी मात्र राजोरिया यांनी आपल्या विधानाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी केली. “ते एक विद्वान व्यक्ती असून माझे मित्र आहेत.

### जन्म देणे हा सर्वस्वी निर्णय जोडप्यांचा

लोकसंख्येची भरमसाठ वाढ हा जगभरात चिंतेचा विषय ठरत आहे. जेवढी कमी लोकसंख्या असेल, तेवढ्या अधिक शैक्षणिक सुविधा देता येतील. मुस्लिमांची संख्या हिंदूंपेक्षा अधिक होईल, असा भ्रामक विचार पसरवला जात आहे.दुसरीकडे भाजपानं मात्र राजोरिया यांच्या विधानापासून अंतर राखले आहे. पक्षाच्या वतीने सांगण्यात आले की, भाजपा सरकार नियम आणि संविधानानुसार काम करत आहे. राजोरिया जे काही म्हणाले, ते त्यांचे व्यक्तिगत मत होते. मुलांना जन्म देणे हा सर्वस्वी निर्णय जोडप्यांचा असतो.

# कुसुमचा शाहरुख खानच्या गाण्यावर जबरदस्त डान्स!

'ठरलं तर मग' मालिकेत काम करणाऱ्या सगळ्या कलाकारांचा ऑफस्क्रीन एक वेगळा चाहतावर्ग निर्माण झाला आहे. या मालिकेत अर्जुनच्या जवळच्या मित्राची म्हणजेच चैतन्यची भूमिका अभिनेता चैतन्य सरदेशपांडे साकारत आहे. तर, सायलीच्या मैत्रिणीच्या म्हणजेच कुसुमच्या भूमिकेत अभिनेत्री दिशा दानडे झळकत आहे. सध्या मालिकेत सायली-अर्जुनच्या कॉन्ट्रॅक्ट मॅरेजचं भांडं फुटून या दोघांमध्ये कुटुंबीयांमुळे दुरावा आल्याचा सीक्वेन्स चालू आहे. पण, सायली-अर्जुनमधली ही कौटुंबिक दरी कमी करण्यासाठी कुसुम आणि चैतन्य मालिकेत नेहमीच भन्नाट कल्पना शोधत असतात.कुसुम आणि चैतन्य यांची ऑफस्क्रीन एकमेकांशी चांगली मैत्री आहे. यापूर्वी हे दोघं एका तामिळ गाण्यावर थिरकले होते. हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होता. आता या पाठोपाठ चैतन्य आणि दिशा यांनी आणखी एका सुपरहिट बॉलीवूड गाण्यावर डान्स केला आहे.शाहरुख खान आणि काजोल यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'कुछ कुछ होता हैं' हा चित्रपट १९९८ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटाला या वर्षात तब्बल २७ वर्षे पूर्ण होणार आहेत. शाहरुखच्या चित्रपटातील बहुतांश सगळीच गाणी सुपरहिट ठरली. राहुल,



टिना आणि अंजली कॉलेजमध्ये शिक्षण पूर्ण करत असताना एकत्र 'मुझको क्या हुआ है?... कोई मिल गया' या गाण्यावर थिरकले होते. याच बॉलीवूड गाण्यावर चैतन्य आणि दिशा यांनी कमाल एक्स्प्रेशन्स देत जबरदस्त डान्स केला आहे. या दोघांनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. यामुळेच या व्हिडीओला अवघ्या दोन दिवसांत १३ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. या व्हिडीओमध्ये कुसुम साडी नेसून तर, चैतन्य ट्रेडिशनल लूक करुन बॉलीवूड गाण्यावर थिरकत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, चैतन्य आणि दिशा यांच्या डान्स व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. "खूप छान... तुम्ही दोघं पण खूप छान आहात", "लव्हली", "डान्स करताना मधुभाऊंना पण घ्या...", "अप्रतिम मस्तच भारी", "NICE कुसुम ताई आणि चैतन्य दादा" अशा असंख्य प्रतिक्रिया लिहित नेटऱ्यांनी या व्हिडीओवर लाइक्स अन् कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.

## 'तुला शिकवीन चांगलाच धडा

'तुला शिकवीन चांगलाच धडा' ही मालिका १३ मार्च २०२३ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आली. जवळपास दोन वर्षे ही मालिका सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. या मालिकेच्या निमित्ताने प्रेक्षकांना पहिल्यांदाच शिवानी रांगोळे आणि हृषिकेश शेलारची फ्रेश जोडी एकत्र काम करताना पाहायला मिळाली. या दोघांनी मालिकेत अक्षरा-अधिपतीच्या भूमिका साकारल्या आहेत. प्रत्येक आईसाठी 'आयडॉल मुलगा' जसा असतो अगदी तसंच हे अधिपतीचं पात्र आहे. आई भुवनेश्वरीच्या पुढे कोणीही नाही, तिच्या शब्दाबाहेर काहीच नाही अन् तिच्याशिवाय दुसऱ्या कोणाचं ऐकायचं नाही या तत्त्वावर चालणारा अधिपती, कसा साकारायला मिळाला? ही मालिका कशी मिळाली याबद्दल हृषिकेश शेलारने नुकत्याच 'मित्र म्हणे'ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे.

## श्रद्धाच्या फोटोंमुळे चर्चांना उधाण



२०२४ मध्ये श्रद्धा कपूर केवळ 'स्त्री २' च्या प्रचंड यशामुळेच नव्हे, तर पटकथा लेखक राहुल मोदीबरोबरच्या तिच्या कथित नात्यामुळेही चर्चेत आली होती. गेल्या काही काळापासून श्रद्धा आणि राहुल डेटिंगमुळे चर्चेत आहेत. अनेकदा एकत्र दिसल्यामुळे तसेच श्रद्धाने सोशल मीडियावर राहुलबरोबरचे फोटो शेअर केल्यामुळे या चर्चांना उधाण आले. अलीकडेच श्रद्धाचा मोबाईल वॉलपेपरचा एक फोटो व्हायरल झाला, ज्यामुळे त्यांच्या नात्याविषयी पुन्हा चर्चा रंगल्या आहेत. गेल्या आठवड्यात श्रद्धा पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाली, तेव्हा तिने कॅज्युअल पोशाख घातला होता. गुलाबी जॅकेट, निळ्या लेगिंग्सवर तिने केस बांधलेले होते. तिच्याबरोबर एक काळ्या रंगाची जिम बॅग होती आणि ती कारमध्ये जाताना दिसली.कारचा दरवाजा उघडताना, तिच्या फोन स्क्रीनची एका क्षणासाठी झलक पाहायला मिळाली. त्यावर एक वॉलपेपर होता, ज्यामध्ये ती आणि एक व्यक्ती एकमेकांजवळ उभे आहे असे त्या फोटोमध्ये दिसते आहे. यावरून चाहत्यांनी लगेचच अंदाज लावला की तो व्यक्ती राहुल मोदीच आहे, जो श्रद्धाचा कथित बॉयफ्रेंड असल्याचे म्हटले जात आहे.डिसेंबर २०२३ मध्ये श्रद्धाने राहुलबरोबरच्या एका आऊटिंगचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. त्या फोटोमध्ये वडा पावची प्लेट दिसत होती, ज्यावर तिने कॅप्शन लिहिले होते, "मी नेहमी तुला वडा पाव खायला नेण्यासाठी त्रास देत राहू का?

## सिद्धार्थ चांदेकर-मिताली मयेकरचं भांडण

सिद्धार्थ चांदेकर व मिताली मयेकर ही मराठी कलाविश्वातील प्रेक्षकांच्या लाडक्या जोड्यांपैकी एक आहे. या जोडीचा चाहतावर्ग मोठा आहे. अनेकविध कलाकृतीतून हे दोघेही प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसतात. याबरोबरच, सोशल मीडियावरदेखील ते सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. त्यांच्या फोटो, व्हिडीओ, रील्सना प्रेक्षकांची मोठी पसंती मिळते. आता हे सेलेब्रिटी जोडपे पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र काम करताना दिसणार आहे. फसक्लास दाभाडे या चित्रपटाच्या निमित्ताने सिद्धार्थ व मिताली पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहे. या चित्रपटात त्यांनी नवरा-बायकोची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाची सर्वांनाच उत्सुकता आहे. आता मात्र, चित्रपटामुळे नाही तर सिद्धार्थच्या एका वक्तव्यामुळे हे जोडपे चर्चेत आहे. लग्नादिवशीच त्यांचे मोठे भांडण झाले होते, असा खुलासा त्यांनी एका मुलाखतीदरम्यान केला आहे. फर्स्टक्लास दाभाडे या चित्रपटाच्या टीमने नुकताच नवशक्ती या युट्यूब चॅनेलशी संवाद साधला.



## 'ठरलं तर मग'च्या सेटवर मोनिकाचं डोहाळेजेवण

'ठरलं तर मग' मालिकेने गेली दोन वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. या मालिकेत अर्जुनच्या सख्ख्या बहिणीची म्हणजेच अस्मिची भूमिका अभिनेत्री मोनिका दबडेने साकारली आहे. खऱ्या आयुष्यात मोनिका लवकरच आई होणार आहे. काही दिवसांपूर्वीच इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत अभिनेत्रीने ती आई होणार असल्याचं जाहीर केलं होतं. नुकताच अभिनेत्रीच्या डोहाळेजेवणाचा कार्यक्रम पार पडला.मोनिका दबडेचं डोहाळेजेवण 'ठरलं तर मग' मालिकेच्या सेटवर पार पडलं. तिच्या डोहाळेजेवणासाठी सेटवर सुंदर अशी सजावट करण्यात आली होती. याशिवाय मालिकेतल्या सगळ्या अभिनेत्रींनी ऑफस्क्रीन एकत्र येऊन या डोहाळेजेवणाच्या कार्यक्रमात धमाल केल्याचं व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. याचे अनेक INSIDE व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. जुई गडकरी, ज्योती चांदेकर, प्रियांका तेंडोलकर, प्राजक्ता दिघे, श्रद्धा केतकर, दिना दानडे, मयुरी मोहिते, केतकी पालव अशा 'ठरलं तर मग' मालिकेत महत्त्वाच्या भूमिका साकारणाऱ्या सगळ्या अभिनेत्री मोनिकाच्या डोहाळेजेवणासाठी एकत्र जमल्या होत्या होत्या. यांनी तिचं स्वागत करताना सुंदर डान्स केले. अभिनेत्री आई होणार असल्याने तिचे सगळे लाड पुरवून कौतुक केलं. मोनिकाला तिच्या आवडीचे पदार्थ खाऊ घातले. 'ठरलं तर मग' मालिकेच्या निर्मात्या सुचित्रा बांदेकर यांनी देखील या कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती.मोनिकाने डोहाळेजेवणासाठी सुंदर अशी साडी नेसून पारंपरिक लूक केला होता. यावर फुलांचे दागिने, साडीवर 'आई' नाव लिहिलेला बॅच, हातात फुलांची परडी या लूकमध्ये मोनिका खूपच सुंदर दिसत होती. मोनिका व तिच्या पतीने या कार्यक्रमात एकमेकांसाठी खास उखाणे घेतले.

# खेळाडूंच्या उपस्थितीने क्रिकेट पंढरी दुमदुमली!

## वानखेडे स्टेडियमने भारतीय क्रिकेटला खूप काही दिले

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशांतर्गत क्रिकेटपासून आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामन्यांचे आयोजन करताना अनेक संस्मरणीय सामन्यांचे साक्षीदार राहिलेले वानखेडे स्टेडियम ५० वर्षांचे झाले. एखाद्या मैदानाचा हा प्रवास केव्हाही कुतुहलाने भरलेला असतो आणि याचीच प्रचिती रविवारी मैदानाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाच्या पूर्वार्धात तारांकित खेळाडूंच्या उपस्थितीने आली. मिलिंद रेगे, लालचंद राजपूत, शिशिर हट्टंगडी अशा आठवणींच्या कप्प्यात राहिलेल्या खेळाडूंपासून आजही क्रिकेटशी नाळ जोडून राहिलेल्या सुनील गावस्कर, संजय मांजरेकर, वसिम जाफर यांच्या उपस्थितीने क्रिकेटची पंढरी मानले गेलेल्या मुंबईतील वानखेडे स्टेडियम दुमदुमून गेले होते.**




सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या उत्तरार्धात १९ जानेवारीस मुख्य कार्यक्रम होणार असून, त्या वेळे आणखी वलयांकित खेळाडूंच्या उपस्थितीने मैदान उजळून निघेल. वानखेडे स्टेडियमने भारतीय क्रिकेटला खूप काही दिले आहे. मैदानाचे योगदान खूप मोठे आहे. रणजी व दुलिप करंडक विजेतेपदापासून कसोटी सामन्यातील विजय आणि २०११ विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद या मैदानाने पाहिले. अशा या अलौकिक ख्याती असलेल्या स्टेडियमच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात सहभागी होणे हे माझ्यासाठी अभिमानाचे आहे, अशा शब्दात सुनील गावस्कर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.या कार्यक्रमात गावस्कर व माजी खेळाडू विनोद कांबळीसह मुंबईच्या माजी कर्णधारांना या वेळी सन्मानित करण्यात आले. गावस्कर रविवारी झालेल्या या कार्यक्रमात सन्मानित झालेले पहिले कर्णधार होते. त्यांना मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) अध्यक्ष अजिंक्य नाईक यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह भेट देण्यात आले.“एक सलामी फलंदाज म्हणून मी कधीच सुरुवात चुकवत नाही. शालेय क्रिकेटमधून सुरुवात केल्यानंतर मला संधी दिल्याबद्दल मी ‘एमसीए’चे आभार मानतो. ‘एमसीए’ने मला सदैव पाठिंबा दिल्याने मी आज या स्तरावर पोहचू शकलो. मला इथे बोलावल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार मानतो,” असे गावस्कर म्हणाले. ‘एमसीए’चे माजी अध्यक्ष विजय पाटील यांनाही सन्मानित करण्यात आले. माजी भारतीय फलंदाज विनोद कांबळीच्या उपस्थितीने सर्वांचे लक्ष वेधले. कांबळीचे आरोग्य ढासळल्याने २१ डिसेंबरला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता कांबळी आजारातून सावरत असून कार्यक्रमाला माजी सहकाऱ्यांशी ते भेटताना दिसले. मी इंग्लंडविरुद्ध आपले पहिले द्विशतक येथेच झळकावले होते. यानंतर मी आपल्या कारकीर्दीत अनेक शतकी खेळी केल्याची आठवण विनोद कांबळीने सांगितली. कार्यक्रमापूर्वी मुंबई क्रीडा पत्रकार संघटना व ‘एमसीए’ पदाधिकाऱ्यांमध्ये झालेल्या सामन्यात ‘एमसीए’ संघाने विजय नोंदवला.सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या उत्तरार्धात १९ जानेवारीस मुख्य कार्यक्रम होणार असून, त्या वेळे आणखी वलयांकित खेळाडूंच्या उपस्थितीने मैदान उजळून निघेल. वानखेडे स्टेडियमने भारतीय क्रिकेटला खूप काही दिले आहे.

मैदानाचे योगदान खूप मोठे आहे. रणजी व दुलिप करंडक विजेतेपदापासून कसोटी सामन्यातील विजय आणि २०११ विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद या मैदानाने पाहिले. अशा या अलौकिक ख्याती असलेल्या स्टेडियमच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात सहभागी होणे हे माझ्यासाठी अभिमानाचे आहे, अशा शब्दात सुनील गावस्कर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमात गावस्कर व माजी खेळाडू विनोद कांबळीसह मुंबईच्या माजी कर्णधारांना या वेळी सन्मानित करण्यात आले.

### मुंबईच्या या कर्णधारांचा गौरव

संजय मांजरेकर, वसिम जाफर, राजू कुलकर्णी, चंद्रकांत पंडित, लालचंद राजपूत, मिलिंद रेगे, नीलेश कुलकर्णी, सिद्धेश लाड, शिशिर हट्टंगडी , पृथ्वी शॉ, शोभा पंडित, अरुंधती घोष, दीपा मराठे, अपर्णा कांबळी यासह मुंबईच्या पुरुष व महिला संघाच्या कर्णधारांना सन्मानित करण्यात आले. सचिन तेंडुलकर, रोहित शर्मा, दिलीप वेंगसरकर यांच्यासह माजी कर्णधार रवी शास्त्री, अजिंक्य रहाणे, सूर्यकुमार यादव व डायना एडुल्जीसारखे अन्य दिग्गज खेळाडूंची या कार्यक्रमाला उपस्थिती नसली, तरीही १९ जानेवारीला होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याची शक्यता आहे. गावस्कर रविवारी झालेल्या या कार्यक्रमात सन्मानित झालेले पहिले कर्णधार होते. त्यांना मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) अध्यक्ष अजिंक्य नाईक यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह भेट देण्यात आले. शालेय क्रिकेटमधून सुरुवात केल्यानंतर मला संधी दिल्याबद्दल मी ‘एमसीए’चे आभार मानतो.

---

# चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ जाहीर

## आफ्रिकेचा एडन मारक्रम नाही तर ‘हा’ खेळाडू कर्णधार

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेला फेब्रुवारीमध्ये सुरूवात होणार आहे. दरम्यान या स्पर्धेत सहभागी होणारे संघ आपापल्या संघांची घोषणा करत आहेत. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये एकूण ८ संघ सहभागी होणार असून त्यापैकी १२ जानेवारीपर्यंत ५ संघांची घोषणा करण्यात आली होती आणि आता दक्षिण आफ्रिकेने आपला संघ जाहीर केला आहे.**




दक्षिण आफ्रिकेचे टी-२० आणि वनडेचे मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनी ICC चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी १५ सदस्यीय संघ जाहीर केला. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ १९ फेब्रुवारी ते ०९ मार्च या कालावधीत पाकिस्तान आणि दुबईमध्ये होणार आहे. टेम्बा बावुमा या स्पर्धेत संघाचे नेतृत्व करेल. या संघात १० खेळाडू आहेत जे २०२३ च्या विश्वचषकात खेळले होते. या विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेने उपांत्य फेरी गाठली होती. दक्षिण आफ्रिकेचे ॲनरिक नॉर्किया आणि लुंगी एनगिडी दुखापतीमुळे मोठ्या विश्रांतीनंतर संघात परतले आहेत. दुखापतीमुळे मायदेशातील संपूर्ण आंतरराष्ट्रीय हंगाम खेळू न शकलेले वेगवान गोलंदाज एनरिक नॉर्किया आणि लुंगी एनगिडी यांची दक्षिण आफ्रिकेच्या एकदिवसीय संघात निवड करण्यात आली आहे. नॉर्किया हा पायाच्या बोटाला फ्रॅक्चर झाल्याने बराच काळ बाहेर होता, तर लुंगी एनगिडी मांडीला दुखापत झाली होती. विआन मुल्डर, टोनी डी जॉर्जी आणि रायन रिक्लेटन प्रथमच आयसीसी स्पर्धेत खेळणार आहेत. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या ब गटात दक्षिण आफ्रिका असून २१ फेब्रुवारीला कराचीमध्ये अफगाणिस्तानविरुद्धच्या मोहिमेची सुरुवात करतील. त्यानंतर २५ फेब्रुवारीला ते रावळपिंडी येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळतील आणि त्यांचा अंतिम गट सामना १ मार्च रोजी इंग्लंडविरुद्ध होईल.

### बावुमाला संघाचे कर्णधारपद

एडन मारक्रम संघाचा भाग असला तरी टेम्बा बावुमाला संघाचे कर्णधारपद देण्यात आले आहे.
एडन मारक्रमच्या नेतृत्त्वाखाली पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये म्हणजेच टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये संघ अंतिम फेरीत पोहोचला होता. पण मारक्रमच्या तुलनेत बावुमाचा वनडे सामन्यात कर्णधार म्हणून रेकॉर्ड चांगला आहे. बावुमाच्या नेतृत्त्वाखाली संघाने २०१८ ते २०२४ दरम्यान ३८ सामने खेळले आहेत, ज्यापैकी २१ सामने जिंकले असून १४ सामने गमावले आहेत.